FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154197

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. २८, वर्ष Year २०२२ दिनांक Date २४/१०/२०२२

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, कलमे Sections कलम ७ (अ)
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........, तारीख पासून Date from २८/०९/२२ वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to २४/१०/२२ वेळ Time ०२.०५ वा

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २८/०९/२०२२, वेळ Time ........

   (c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ........, तारीख Date २४/१०/२२ वेळ Time ०२.०५ वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P. S. उत्तर, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ........

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name केक बहार, ठिकाणाचे नंबर No. if any मढारवाडी मशिदच्या बाजूला, गल्ली Ward ........, रस्त्याचे नाव Name of road ........

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place मालाड (प), गाव Village मुंबई, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र

   (c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name मो. शरीफ मो. अब्बास शेख (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name मो. अब्बास शेख

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ........ (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. ८८२००५६८५२

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of issue ........, दिल्याचे ठिकाण Place of issue ........ (f) व्यवसाय Occupation ........

   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ........, जनजाती Sub-Caste ........

   (h) पत्ता Address : ........, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........, घर / नाव नं. House/Name No. ३६४, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........, पॅन नं. PAN No. ........, मतदार नं. Card No. ........

   रस्त्याचे नाव Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........

   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address सर्वे खोली क्र., अंबेडकरवाडी, अब्दुलनगर गेट नं. ८, चंद्रमणी बुद्धविहार जवळ मालवणी मालाड (प) मुंबई

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   रज्जाक मकबुल पटवाडी उर्फ राजू वय ६२ वर्षे, रा.ठी. मालवणी म्हाडा कॉलनी बिल्डींग रूम नं. १०१, मालवणी, मालाड, मुंबई - ९५

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with OKEN Scanner

फिर्यादी यांचा स्वतंत्र पानावर घेण्यात आलेला जबाब हाच प्रथम खबरी अहवाल म्हणुन समजण्यात यावा.

मो०शरीफ

समक्ष

पंकज शिंदे
पोलिस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

फिर्याद                    दिनांक १३/१०/२०२२

श्री. मो. शरीफ अब्बास शेख वय ३५ वर्षे रा.ठि. रूम नं ३६४ संघर्ष सोसायटी, अंबोजवाडी आझादनगर गेट नं ८ मालवणी मालाड (पश्चिम) मुंबई. ४०००९५. मो.क. ९९२००५६४५३.

..........

मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी मागील ०१ वर्षापासुन माझ्या कुटुंबासमवेत रहावयास आहे. माझा भाजीपाला विक्रीचा व्यवसाय आहे. त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी राहत असलेले घर हे माझी पत्नी साबीया हिच्या नावे आहे. त्या घराला महानगरपालिका यांचे पाण्याच्या नळाचे कनेक्शन नसल्याने पाण्याचे नळ कनेक्शन घेण्याकरीता महानगर पालिका पी/उत्तर वॉर्ड मालाड येथे मी दि. ०७/०९/२०२२ रोजी अर्ज केला होता. दि. ०५/०९/२०२२ रोजी मी नळ कनेक्शन घेण्याकरीता पी/उत्तर वॉर्ड मालाड येथे महानगर पालिका कार्यालयात गेलो होतो. तेथील लोकांना मी राहत असलेल्या एरिया मधील पाणी नळ कनेक्शन कोण देतो याबाबत विचारपूस केली असता त्यांनी मला त्या कार्यालयाच्या सातव्या मजल्यावर असलेल्या राऊत साहेब यांना भेटा असे सांगितले. त्या दिवशी मी राऊत साहेब यांना भेटलो त्यांनी मला राजू प्लंबर यास भेट आणि फाइल बनवून घे असे सांगितले. मी राजू प्लंबर बाबत विचारपूस केली असता ते त्याच ठिकाणी जवळपास मिळून आले त्यांनी मला फाईल बनवण्या करता अर्ज दिला तो अर्ज मी घरी जावुन पत्नी साबीया हिची सही घेवुन परत राजु प्लंबर यास दिला. नंतर राजु याने नंतर येण्यास सांगीतल्यानंतर मी नियमीत कार्यालयात जात होतो व राजु प्लंबर यास नळ कनेक्शन बाबत विचारत होतो त्यावेळी मला राजु प्लंबर याने दि. १३/०९/२०२२ रोजी महानगर पालिका कार्यालय येथे ८००/- रुपये भरण्यास सांगितले व त्यानंतर तुझी फाईल पुढे जाईल असे सांगितले. मी महानगर पालिका यांची ८००/- रुपये फि भरली व त्याची पावती घेतली तरी नळ कनेक्शन येत नसल्याने मी दि. २३/०९/२०२२ रोजी पुन्हा राऊत साहेब यांना भेटण्यास गेलो. त्यावेळी त्यांनी मला पुन्हा राजु प्लंबर यास भेटण्यास सांगीतले. त्यावेळी मी राजु प्लंबर यास भेटलो असता त्याने सांगीतले की, राऊत साहेब यांना २२००/- रुपये द्यावे लागतील तरच काम होईल. लोकसेवक व राजु प्लंबर यांना पैसे/लाच देण्याची माझी ईच्छा नसल्याने दि. २६/०९/२०२२ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई. कार्यालयात तक्रार देण्याकरीता आलो.

तेथे आल्यानंतर मी माझी तक्रार वरिष्ठांना सांगितली व वरिष्ठांनी पो.नि. पंकज शिंदे यांना बोलावून माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पो.नि. पंकज शिंदे हे मला एका कक्षात घेवुन गेले. पो.नि. पंकज शिंदें यांनी तेथे केबिनमध्ये उपस्थित असलेल्या एका इसमाची ओळख सहाय्यक पोलीस आयुक्त उमेश पाटील अशी मला करून दिली व ते माझ्या

मो०शरीफ

समक्ष
पंकज नामदेव शिंदे
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

तक्रारीचे कारवाई दरम्यान देखरेख अधिकारी म्हणून काम पाहणार असल्याचे सांगितले. पो.नि. पंकज शिंदे यांनी माझे तक्रारीबाबत विचारपुस करून मला माझी तक्रार लेखी देण्यास सांगितले. मला लिहीता– वाचता येत नसल्याने मी माझी तक्रार पोलीस निरीक्षक श्री पंकज शिंदे यांना सांगीतली असता त्यांनी संगणकावर मराठी भाषेत टाईप केली आहे. ती मला त्यांनी वाचुन हिंदीतुन समजावुन सांगीतली. माझे सांगण्यावरून तकार अर्ज तयार केला व त्याखाली मी माझी स्वाक्षरी केली व सदर तकार अर्ज मी पो.नि. पंकज शिंदे यांचेकडे दिला.

दि. २६/०९/२०२२ रोजी पो.नि. पंकज शिंदे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात आवश्यक कारवाई पुर्ण करून माझा तक्रार अर्ज पुन्हा पंचासमक्ष वाचुन त्यावर पोनि पंकज शिंदे व पंचांच्या सहया घेतल्या त्यानंतर माझे तक्रारीची पडताळणी करण्याकरिता मी, पंच व पोलीस पथक असे दोन पोलीस वाहनातून लोकसेवक यांचे कार्यरत ठिकाणी पी/उत्तर वॉर्ड मालाड येथे जाणेकरिता पथकासह रवाना झालो. आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथून निघून सुंदरनगर गोरेगाव येथील एम टी एन एल ऑफीसच्या जवळ आल्यावर पो.नि. पंकज शिंदे यांचे सांगण्यावरून वाहन चालक यांनी वाहन कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने थांबविले.

त्यानंतर मला शर्टाच्या आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझे सोबत पंच श्री. संदीप सुखदेव बोटकर यांचेसह लोकसेवक यांना भेटण्यासाठी पी/उत्तर वॉर्ड मालाड येथे त्यांच्या कार्यालयात गेलो असता, तेथे लोकसेवक श्री राऊत यांची भेट झाली नाही. इतर लोकसेवक यांनी लोकसेवक राऊत हे ५ मिनीटांपूर्वीच कार्यालयातून निघून गेल्याचे मला सांगितले. त्यामुळे लोकसेवक यांची भेट झाली नाही. कार्यालयाच्या बाहेर मला राजूभाई प्लंबर भेटला असता मी त्यांच्याशी नळ कनेक्शनच्या कामासंदर्भात चर्चा केली त्यावेळी राजूभाईने लोकसेवक राऊत यांच्या करीता २०००/– रू. लाचेच्या रकमेची मागणी केली. तसेच राजू भाई यांचा वारंवार फोन येत असल्याने मी त्यास उलट फोन केला असता साहब का दो हजार छोडके ....दुसरा दस हजार तयार रखो ....लेके आवा ... असे बोलून राजू याने पुन्हा लाचेची मागणी केली. सदरचे संभाषण व्हाइस रेकॉर्डर वर ध्वनीमुद्रीत करण्यात आले. परंतू लोकसेवक यांची भेट झाली नसल्याने दि. २७/०९/२०२२, दि. २८/०९/२०२२, दि. ०४/१०/२०२२ व दि. ०६/१०/२०२२ रोजी देखील पडताळणी कारवाईचे आयोजन करण्यात आले. परंतू लोकसेवक राऊत यांची भेट झाली नाही. त्यामुळे दि. ११/१०/२०२२ रोजी पुन्हा पडताळणी कारवाईचे आयोजन करण्यात आले. दि. ११/१०/२०२२ रोजी मी पंच श्री बारब्दे यांच्यासह लोकसेवक यांना भेटण्यासाठी त्यांच्या कार्यालयात गेलो असता इतर लोकसेवक यांनी लोकसेवक राऊत हे मिटींगमध्ये असल्याचे

समक्ष

(पंकज शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक

मो०शरीफ

Scanned with OKEN Scanner

सांगितले. त्यानंतर मी पंचासह शासकीय वाहन थांबले त्याठिकाणी आलो. वारंवार जावूनही लोकसेवक राऊत यांची भेट होत नसल्याने आम्ही लोकसेवक राऊत यांना माझा मो.क्र. ९९२००५६४५३ वरून त्यांच्या मो.क्र. ९३२१४४९६८६ यावर फोन करण्याबाबत ठरवले. त्यानुसार राऊत यांना फोन करून माझा मोबाईल लाऊडस्पीकर वर ठेवून नळ कनेक्शनच्या फाईल बद्दल विचारणा केली असता लोकसेवक राऊत यांनी सांगितले की, 'राजु को हि पकड....राजु के साथ हि बात कर ....उस को हि पुछ ...मेरा कनेक्शन कहा तक आया .....कुछ प्राब्लम होंगा तो राउत साहब ने बुलाया तो उनके पास जा के.... बात कर ....' असे सांगितले. तसेच आमचे फोनवरील संभाषण हे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दूवारे ध्वनीमुद्रीत करण्यात आले. सपोआ उमेश पाटील व पो.नि. पंकज शिंदे यांनी पडताळणीच्या वेळी झालेल्या संभाषणाची हकीगत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले.

लोकसेवक राऊत यांनी राजू ला भेटण्यास सांगितल्यावरून आज दि. १३/१०/२०२२ रोजी पुन्हा पडताळणी/सापळा पूर्व/सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले.

आज दि. १३/१०/२०२२ रोजी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई याठिकाणी येण्यास बराच वेळ लागणार असल्याने मला परस्पर मालाड मुंबई या ठिकाणी हजर राहण्याबाबत पो.नि. शिंदे यांनी सांगितले. मी मालाड येथील इनॉर्बिट मॉलच्या बाहेर येवून थांबलो. त्यानंतर १०.३० वा च्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे शासकीय वाहन त्याठिकाणी आले. पो.नि. शिंदे यांनी शासकीय वाहनातच वक्तव्य घेतले.

त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी तांत्रिक शाखेतील पो.ह. ढोबळे यांच्या मदतीने व्हाइस रकॉर्डर चालू केला. मी खाजगी इसम राजू यास ११.४० वा. व ११.४२ वा. असे ०२ वेळा माझ्या फोनवरून फोन लावला परंतू राजू भाई याने फोन उचलला नाही. राजूभाई याचा पुन्हा फोन येईल म्हणून आम्ही सुमारे पाऊन तास वाट पाहिली. परंतू राजू भाई याचा फोन आला नाही. म्हणून आम्ही पुन्हा राजूभाई यास पुन्हा फोन लावण्याचे ठरवले. त्यानुसार राजूभाई १३.३८ वा पुन्हा फोन लावला असता, त्याने माझा फोन उचलला. परंतू फोन मध्येच कट झाल्याने १३.४१ वा पुन्हा त्यास फोन केला असता, मी राजूभाई यास दो हजार बोले थे ना साहब को देना है असे बोलले असता, राजूभाई याने मला पुरी दुनिया को डिक्लेर करके बताएगा क्या असे बोलून सुनावले. तसेच पैसे घेवून कुठे येवू असे मी राजूभाई यास विचारले असता मेरे को म्हाडा मिल. असे बोलला. व तसेच त्यांनी मला फोन वरतीच पठाणवाडी मस्जिदचे समोर भेटण्यास येण्यास सांगितले.

समक्ष
(सही)
(पंकज शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक

(सही) मो0शरीफ

Scanned with OKEN Scanner

श्री. मो. शरीफ अब्बास शेख यांचा दिनांक १३/१०/२०२२ रोजीचा जबाब पुढे चालू

खाजगी इसम राजूभाई यांनी लाचेची मागणी केल्याने स्पष्ट झाल्याने व ती आणुन देण्यास सांगितल्याने त्वरीत सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे पोनि पंकज शिंदे यांनी सांगितले. मी लाच देण्याकरिता रक्कम सोबत आणली आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी लाचेकरीता लागणारी रक्कम मी माझे बचतीमधुन आणली असल्याचे पो.नि. पंकज शिंदे यांना सांगितले. माझे बचतीतील रूपये २०००/– रक्कम (रू. ५००/– दराच्या ४ भारतीय चलनी नोटा) पो.नि. पंकज शिंदे यांचे समक्ष सादर केल्या. त्यांनी सापळा पथकातील अंमलदार मार्फत माझी अंगझडती घेतली व मी लाच म्हणून देण्याकरिता आणलेली रक्कम रू. २,०००/– वगळून अंगझडतीमध्ये मिळून आलेल्या इतर चीजवस्तू व रक्कम मला परत केली व ती पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवण्यास सांगितली.

त्यानंतर पो.नि. पंकज शिंदे यांनी मला व पंचांना लाचेकरिता दयावयाचे रक्कमेस अॅंथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस वाहनाचे चालक श्री. हटकर यांना बोलावून मला व पंचांना अॅंथ्रासिन पावडरचे गुणधर्म सांगून प्रात्यक्षिक सापळा कारवाई नंतर दाखविण्यात येणार असल्याचे मला व पंचाना सांगितले. त्यावेळी त्यांनी गाडीत असलेल्या पेटीतून एक डब्बा बाहेर काढून अॅंथ्रासीन पावडरचे गुणधर्म मला पंचांसमक्ष समजावुन सांगितले. त्यानंतर लोकसेवक किंवा खाजगी इसम राजू यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर इशारा म्हणुन माझे केसावरून हात फिरवण्याचा इशारा करण्यास सांगितला. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच खाजगी इसम नामे राजू भाई यांस रंगेहात पकडतील असे सांगितले व सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेच्या आवश्यक त्या सुचना मला व पंच क्र. ०२ श्री. बारब्दे यांना दिल्या.

त्यानंतर पोलीस वाहनात वाहन चालक श्री. हटकर यांनी पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अॅंथ्रासीन पावडर लावुन सदरची रक्कम माझे शर्टच्या खिशामध्ये अलगद ठेवली. पो.नि. पंकज शिंदे यांनी यापुढील कारवाईत श्री. हटकर सहभागी असणार नाहीत असे मला व पंचांना सांगितले.

त्यानंतर मी, पंच व सापळा पथक असे पठाणवाडी च्या दिशेने जाण्यासाठी शासकीय वाहन क्र. एम एच ०४ ए एन १७०४ ने निघालो. दिंडोशी पोलीस ठाण्याच्या बाजूला असलेल्या मेट्रो ब्रिज जवळ कोणास संशय येणार नाही अशा रितीने पो.नि.शिंदे यांनी चालक हटकर यांना वाहन थांबवण्यास सांगितले. त्यावेळी सुमारे १४.०० वाजले होते.

त्यानंतर पो.नि. पंकज शिंदे यांनी मला, पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाई बाबत सूचना दिल्या. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टाच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. ओंकारेश्वर बारब्दे यांचेसह सापळा कारवाईकरीता खाजगी इसम राजू भाई याने बोलावलेल्या पठाणवाडी मस्जिद याठिकाणी पायी रवाना झालो. माझे व पंचांचे मागे पुढे सापळा पथक हे देखील कोणास संशय येणार नाही अशा पध्दतीने रवाना झाले.

समक्ष
(सही)
(पंकज शिंदे)
पोलीस/निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक

मो०शरीफ (सही)

Scanned with OKEN Scanner

राजूभाई याने सांगितल्याप्रमाणे पठाणवाडीमधील मस्जिदच्या बाजूचे कॅफे बहारच्या दिशेने चालत निघालो. माझे मागेपुढे पोलीस पथक देखील पायी चालत होते. हॉटेल कॅफे बहारपासून काही अंतरावर मी पोहचलो असता, राजूभाई याचा फोन येत होता त्यावेळी हॉटेल कॅफे बहारच्या समोर राजू भाई उभा असल्याचे मला दिसले त्यास मी हात उंचावून येत असल्याचे खुणावले. त्यानंतर मी राजूभाई यास जावून भेटलो तेव्हा राजूभाई मला हॉटेलमध्ये घेवून गेले. त्याचवेळी पंच बारब्दे हे देखील आमच्या बाजूच्या टेबलवर येवून बसले.सदर वेळी मी राजूभाई यास फाईलबाबत विचारणा करून मी माझे शर्टच्या खिश्यातील लाचेची रक्कम रूपये २०००/— बाहेर काढुन खाजगी इसम यांचे समोर केली असता, त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या शर्टच्या खिश्यात ठेवली. त्यावर मी लागलीच सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत इशारा म्हणुन माझे केसावरून हात फिरवून पथकास इशारा केला. त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी खाजगी इसम श्री रजाक मकबुल पटवारी उर्फ राजू यांस लाच स्विकारताना रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी माझे शर्टास लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करुन स्वत:च्या ताब्यात घेतला.

त्यानंतर कॅफे बहार हॉटेल येथून आम्ही पंच व पथकासह दिंडोशी पोलीस ठाणे येथे आलो सपोआ पाटील तेथील प्रभारी अधिकारी यांच्या परवानगीने एक कक्ष उपलब्ध करून घेतला व त्याठिकाणी पो.नि. शिंदे यांनी पंचांसमक्ष वर नमुद खाजगी इसम यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता बाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. इसम श्री रजाक मकबुल पटवारी उर्फ राजू, वय ६२ वर्षे, धंदा — प्लंबिंग/मजुरी काम राठि— मालवणी म्हाडा क्लासिक बिल्डिंग रूम नं १०१, मालवणी मालाड मुंबई. ४०००९५ असे सांगितले.

त्यानंतर हात तपासण्याची व इतर प्राथमिक कारवाई दिंडोशी पोलीस ठाणेतील सदर कक्षामध्ये पूर्ण करण्यात आली. सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी येथे जावून करण्यात येणार असल्याचे पो.नि.शिंदे यांनी सांगितले. त्यानुसार मी, पंच, सापळा पथक व खाजगी इसम श्री रजाक मकबुल पटवारी उर्फ राजू यांचे सह लाचलुचपत कार्यालयात आलो व पुढील कारवाई करण्यात आली.

तरी मी राहत असलेल्या घरात महानगरपालिका यांच्या पाण्याचे नळाचे कनेक्शन घेण्याकरीता मी श्री रजाक मकबुल पटवारी उर्फ राजूभाई यास संपर्क केला असता त्याने मला महानगर पालिका पी/उत्तर वॉर्ड मालाड येथील अधिकारी यांच्याशी त्याची ओळख असल्याचे भासवून तुला मी महानगरपालिकेचे पाणी कनेक्शन मिळवून देतो. असे सांगून दि. २६/०९/२०२२ रोजी "साहब का दो हजार छोडके ....दुसरा दस हजार तयार रखो ....लेके

समक्ष

(पंकज शिंदे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबधंक

मो०शरीफ

Scanned with OKEN Scanner

आवा ..." असे बोलून लाचेची मागणी करून आज दि. १३/१०/२०२२ रोजी १४.२० वा. लाचेची रक्कम रूपये २०००/– कॅफे बहार हॉटेल पठाणवाडी मुंबई याठिकाणी स्विकारली.

म्हणुन माझी रजाक मकबुल पटवारी उर्फ राजूभाई यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. खाजगी इसम नामे रजाक मकबुल पटवारी उर्फ राजूभाई यांचेशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला हिंदीतुन समजावुन सांगीतली असता ती माझे सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

मो० शरीफ

समक्ष,

( पंकज शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........................................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........................................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........................................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

यातील नमूद ठिकाणी वेळी यातील फिर्यादी राहत असलेल्या घरात महानगरपालिका यांच्या पाण्याचे नव कनेक्शन घेण्याकरीता आरोपी यांच्याशी संपर्क केला असता त्याने फिर्यादीस महानगरपालिका पी/उत्तर वार्ड मालाड येथील अधिकारी यांच्याशी त्यांची ओळख असल्याचे भासवून महानगरपालिकेचे पाण्याचे कनेक्शन मिळवून देतो असे सांगून दि. २८/०९/२२ रोजी "साहब का दो हजार छोडके - दुसरा दस हजार तयार रखो.... लेके आओ" असे बोलून लाचेची मागणी करून दि. १३/१०/२२ रोजी १४.२० वा. लाचेची रक्कम रु. २०००/- बहार हॉटेल, मालवणी मुंबई [illegible] स्विकारले आरोपी [illegible] यांनी भ्र.प्र. अधि. कलम ७अ(अ) प्रमाणे गुन्हा केला आहे.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक पंकज नामदेव शिंदे ..........................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........................................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........................., जिल्हा .........................., राज्य ..........................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........................................................ (3) Transferred to P. S. ........................................................ District........................................................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.) मो० शरीफ

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name पंकज नामदेव शिंदे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ..........................................

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख १४/१०/२०२२

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner